***राज्य मंत्रिमंडळ निर्णय :** १७ भाद्रपद १९३२ शके(सायं ५.३० वा.)
दिनांक : ८ सप्टेंबर २०१०

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना**
**अधिनियमातील बदलास मान्यता**

मुंबई, दि. ८ : महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमातील कलम २२ (ड) मध्ये वाढीव चटईक्षेत्र निर्देशांक मंजुरीसाठी, विशेष परवानगीसाठी (उदा. जिना, लिफ्ट, लॉबी आदी) चटईक्षेत्रातून सूट देण्यासाठी, स्वेच्छाधिकार वापरुन विकास नियंत्रण नियमावलीतील चटईक्षेत्र निर्देशांकाव्यतिरिक्त इतर बाबींमध्ये सवलत देण्यासाठी प्रिमियम आकारण्याबाबत सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला. सदर तरतुदी पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्यासाठी व प्रकरणाची निकड लक्षात घेऊन राज्यपालांच्या मान्यतेने याबाबत अध्यादेश निर्गमित करण्यासाठी मंत्रिमंडळाने मंजुरी दिली.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ मधील तरतुदीनुसार राज्यातील सर्व नागरी क्षेत्राच्या विकास योजना विकास नियंत्रण नियमावलीसह तयार करण्यात येतात. सदर विकास योजनेच्या माध्यमातून शहरांचा सर्वांगीण व नियोजनबध्द विकास घडवून आणण्याचा उद्देश आहे. सदर विकास योजना व त्यामधील विविध सार्वजनिक सुविधांच्या आरक्षणांची अंमलबजावणी करणे हे प्रत्येक नियोजन प्राधिकरण म्हणजेच महानगरपालिका, नगर परिषदा, नगर पंचायती, विशेष नियोजन प्राधिकरणे आदींचे कर्तव्य आहे. याप्रमाणे विकास योजनेची अंमलबजावणी करुन सार्वजनिक सुविधा तसेच इतर पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी मोठया प्रमाणात निधीची आवश्यकता आहे. त्यासाठी सदर अधिनियमात विकास शुल्क (Development Charges) वसूल करण्याच्या तरतुदी आहेत तसेच विकास नियंत्रण नियमावलीत विविध प्रकारच्या बाबीसाठी प्रिमियम आकारण्याच्या तरतुदी आहेत. तथापि, प्रिमियम आकारण्याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमात स्पष्ट तरतूद नसल्याचे निदर्शनास आल्यामुळे सदर अधिनियमामध्ये सुधारणा करणे आवश्यक झाले आहे.

अधिनियमातील सदर सुधारणेमुळे सार्वजनिक सुविधा तसेच पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध होऊन जनतेस सार्वजनिक सुविधा पुरविण्यासाठी मदत होणार आहे.

ooooo

..२/-.

**मानवी अवयव प्रत्यारोपण सुधारित कायदा**
**राज्य विधी मंडळात मंजूर करण्यास मान्यता**

मुंबई, दि. ८ : मानवी अवयव प्रत्यारोपण सुधारित कायदा महाराष्ट्र राज्यात जसाच्या तसा लागू करण्याचे अधिकार संसदेला देण्याबाबतचा ठराव राज्य विधी मंडळात मंजूर करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

मानवी अवयव प्रत्यारोपण कायद्यास संसदेने १९९४ मध्ये मंजुरी दिल्यानंतर सदर कायदा १९९५ पासून अस्तित्वात आला. सदर कायदा महाराष्ट्र राज्यात जसाच्या तसा लागू करण्याचे अधिकार संसदेला देण्याबाबतचा ठराव महाराष्ट्र विधान मंडळाने दिनांक १४ जुलै, १९९२ रोजी मंजूर केला. त्यानुसार सदर कायद्याची अंमलबजावणी राज्यामध्ये मागील १५ वर्षांपासून होत आहे. मानवी अवयव प्रत्यारोपण कायद्यात सुधारणा करण्याचे केंद्र शासनाने प्रस्तावित केले आहे.

ooooo

## एशियन डेव्हलपमेंट बँक अर्थसहाय्यित
## शाश्वत किनारा संरक्षण व व्यवस्थापन प्रकल्प राबविण्यास मान्यता

मुंबई, दि. ८ : एशियन डेव्हलपमेंट बँक अर्थसहाय्यित शाश्वत किनारा संरक्षण व व्यवस्थापन प्रकल्प राबविण्यास मान्यता देण्यात आली. एशियन डेव्हलपमेंट बँकेचा प्रकल्प हा सन २०१० ते सन २०१९ या कालावधीत ३ टप्प्यांमध्ये राबविण्यात येणार असून या प्रकल्पाची एकूण किंमत ८२७ कोटी रुपये इतकी राहणार आहे.

हा प्रकल्प राबविण्यास व या प्रकल्पाच्या कर्जास हमी देण्यास मान्यता देण्यात आली. प्रकल्प खर्चापैकी ADB चा हिस्सा ४८० कोटी रुपये, राज्य शासनाचा हिस्सा २६५ कोटी रुपये व खासगी क्षेत्राचा वाटा ८१ कोटी रुपये असा राहणार आहे.

राज्यातील ७२० किलोमीटर लांबीच्या समुद्रकिनाऱ्यापैकी ४०० किलोमीटर समुद्रकिनारा हा नैसर्गिकरित्या संरक्षित असून उर्वरित ३२० किलोमीटरची किनारपट्टी धुपप्रवण आहे. या ३२० किलोमीटरपैकी आतापर्यंत १४२ किलोमीटर समुद्रकिनारा धुप प्रतिबंधक बंधारे बांधून संरक्षित करण्यात आला असून १७८ किलोमीटर धुपप्रवण किनारा सुरक्षित करणे गरजेचे आहे.

किनारवर्ती राज्यांपैकी महाराष्ट्र, गोवा आणि कर्नाटक या राज्यातील किनारपट्टीचे धुप होण्यापासून संरक्षण करण्यासाठी जलसंधारण मंत्रालय, भारत सरकार यांनी एशियन डेव्हलपमेंट बँकेकडे सहाय्याची मागणी केली होती. त्याअनुषंगाने ADB ने नियुक्त केलेल्या सल्लागारांनी राज्याच्या किनारपट्टीचा अभ्यास करुन मिऱ्या-बे, ता. जि. रत्नागिरी येथे पथदर्शी प्रकल्प तयार केला आहे. या प्रकल्पामध्ये पारंपारीक उपाय योजनांऐवजी Soft Solutions चा वापर करण्यात येणार आहे. त्यामध्ये, जिओट्युबचा वापर करणे, तिवरांची लागवड करणे, ड्युन्स व्यवस्थापन करणे यांचा समावेश आहे. यासाठी लागणारा खर्च हा पारंपरीक दगडी बंधाऱ्यांच्या तुलनेत बराच कमी असणार आहे. धुपप्रतिबंधक उपाययोजनांसाठी जिओट्युबचा वापर हे या प्रकल्पाचे वैशिष्ठ्य आहे. यामध्ये विशिष्ट प्रकारच्या जिओ टेक्सटाईल फायबर मटेरिअलचा वापर केलेले सागरीकामांचे पर्यावरण अनुकूल तंत्रज्ञान वापरण्यात येणार आहे. या जिओट्युबचा वापर करुन ब्रेकवॉटर तयार केले जाते व कालांतराने त्यावर मत्स्यजीवनाचा विकास होतो. या उपाययोजना ऑस्ट्रेलिया, श्रीलंका, कॅनडा इ. देशांमध्ये यशस्वीरित्या राबविण्यात येत आहेत.

या प्रकल्पाचा पहिला टप्पा सन २०१० ते २०१३ या कालावधीत राबविण्यात येणार असून त्याचा एकूण खर्च ७२ कोटी रुपये राहील. या टप्प्यामध्ये मिऱ्या-बे च्या उत्तरेस सागरी तळाशी ३६० मी. लांबीची **Offshore Submerged Cup Shaped Geotextile Reef** (जिओट्युब) टाकणे व मिऱ्या- बे च्या उत्तरेकडील किनाऱ्यावर वाळूच्या सहाय्याने किनाऱ्याचे संवर्धन (**Beach Nourishment)** करणे, तसेच तांत्रिक सल्लागारांकडून

**एशियन डेव्हलपमेंट बँक..**

राज्यातील उर्वरित धुपप्रवण किनाऱ्यांचा अभ्यास करुन धुपप्रतिबंधक उपाययोजनांचे प्रकल्प तयार करणे यांचा समावेश आहे. तसेच दुसऱ्या टप्प्यात मिरकरवाडा मासेमारी बंदराचा विकास, भगवती बंदर, रत्नागिरी येथील ब्रेकवॉटरचा विकास याबरोबरच किनारपट्टीवरील अतिसंवेदनशील ठिकाणी धुपप्रतिबंधक उपाययोजना हाती घेण्यात येणार आहेत.

या प्रकल्पामुळे जमिनीची धुप थांबून समुद्र किनाऱ्याचे संवर्धन होईल, शेती व घरांचे संरक्षण, मिरकरवाडा मत्स्य बंदरांमध्ये गाळ साचण्याची प्रक्रीया थांबून बंदराची उपयुक्तता वाढेल, माशांच्या वस्तीस्थानासाठी उपयुक्त वातावरण तयार होवून मत्स्य प्रजननामध्ये वाढ होईल, किनाऱ्याचे संवर्धन झाल्यामुळे पर्यटनाच्या संधीमध्ये वाढ होईल त्याचबरोबर मासेमारी नौकांना बंदर कायम उपलब्ध होणार असल्यामुळे मासेमारीच्या उत्पन्नात वाढ होणे अपेक्षित आहे.

ADB प्रकल्पाला मान्यता देण्याबरोबरच मत्स्यव्यवसाय विभाग व किनारी अभियंता यांचेकडील कामे पुर्ण करण्याची जबाबदारी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डावर सोपविण्यात आली आहे. तसेच समुद्र धुपप्रतिबंधक उपाययोजना ही जिल्हास्तरीय योजना, १ एप्रिल २०११ पासून राज्यस्तरीय योजना म्हणून परिवर्तीत करण्यास व ही योजना गृह विभागाच्या अधिपत्याखालील महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली आणण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यामुळे दरवर्षी ६ जिल्ह्यांसाठी प्राप्त होणारी तरतूद राज्यस्तरावर वळती करुन ९ वर्षांच्या प्रकल्प कालावधीसाठी अंदाजित एकूण ३२० कोटी रुपये इतक्या अनुदानामधुन उपलब्ध करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्याचबरोबर, या प्रकल्पाकरीता खासगी क्षेत्राच्या सहभागापोटी ८१.०० कोटी रुपये इतका निधी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या स्वनिधीतून उपलब्ध करणे, प्रकल्पासाठी १५ संवर्गातील पदे कंत्राटी स्वरुपात भरणे, किनारी अभियंता यांच्याकडील ३७ पदे प्रतिनियुक्तीने महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडे वर्ग करणे व मत्स्यव्यवसाय विभागाच्या कामांसाठी १० टक्के सेंटेज चार्जेस आकारणे या निर्णयांना मंत्रीमंडळाने मान्यता दिलेली आहे.

या निर्णयामुळे मत्स्यव्यवसाय विभाग व किनारी अभियंता यांच्या नियंत्रणाखालील सर्व कामे महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या नियंत्रणाखाली आणण्यात आली असून मंत्रीमंडळाच्या निर्णयामुळे सर्व सागरी कामांमध्ये एकसुत्रता निर्माण होण्यास निश्चितच मदत होणार आहे.

००००००

..५/-

<u>३२ जिल्ह्यात १०० टक्क्यांपेक्षा अधिक पाऊस</u>

# राज्यात खरीप पिकांची वाढ समाधानकारक

मुंबई, दि. ४ : राज्यातील ३२ जिल्ह्यांमध्ये १०० टक्क्यांपेक्षा अधिक पाऊस झाला आहे. नाशिक, नंदूरबार आणि कोल्हापूर या ३ जिल्ह्यांमध्ये ७६ ते १०० टक्के पाऊस झाला आहे. राज्यात ६ सप्टेंबर अखेर ३५५ तालुक्यांपैकी १७ तालुक्यात ६० ते ८० टक्के, ६१ तालुक्यात ८० ते १०० टक्के आणि २७७ तालुक्यात १०० टक्क्यांपेक्षा अधिक पाऊस झाला.

राज्याची ६ सप्टेंबर अखेर दैनंदिन पावसाची सरासरी ९४९.९ मि.मि. असून प्रत्यक्ष ११५२.३ मि.मि.म्हणजेच सरासरीच्या १२१.३ टक्के पावसाची नोंद झाली आहे.

**राज्यात १४० लाख हेक्टर क्षेत्रात पेरणी**

राज्याचे खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र १३२.३४ लाख हेक्टर असून दिनांक ६ सप्टेंबर २०१० अखेर १४०.२४ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली आहे. सरासरी क्षेत्राशी तुलना करता १०६ टक्के क्षेत्रावर खरीप पिकांची पेरणी झालेली आहे.

राज्यातील खरीप पिकांची वाढ समाधानकारक आहे. भात पीक वाढीच्या ते फुटवे फुटण्याच्या अवस्थेत आहेत. ज्वारी, बाजरी ही पिके फुलोरा अवस्थेत असून लवकर पेरणी झालेले बाजरी पीक दाणे भरण्याच्या अवस्थेत आहेत. कापूस पीक पाते लागण्याच्या अवस्थेत आहेत. बागायती कापूस बोंडे लागण्याच्या अवस्थेत आहे तर मूग आणि उडीद पिके पक्वतेच्या अवस्थेत असून त्यांची काढणी सुरु आहे.

**<u>कोकण विभागात ५.०८ लाख हेक्टरात पेरणी</u>**

या विभागात हवामान ढगाळ व दमट होते. विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ५.०९ लाख हेक्टर असून ५.११ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली आहे. सरासरी क्षेत्राशी तुलना करता १०० टक्के क्षेत्रावर खरीप पिकांची पेरणी/लावणी झालेली आहे.

**<u>नाशिक विभागात पिके समाधानकारक</u>**

खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र १९.८८ लाख हेक्टर असून २१.२७ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली आहे. सरासरी क्षेत्राशी तुलना करता १०७ टक्के क्षेत्रावर खरीप पिकांची पेरणी झाली आहे. पेरणी झालेल्या खरीप पिकांची वाढ समाधानकारक आहे.

**<u>पुणे विभागात ८.३४ लाख हेक्टर क्षेत्रात पेरणी</u>**

खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ७.५४ लाख हेक्टर असून ८.३४ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली आहे. सरासरी क्षेत्राशी तुलना करता १११ टक्के क्षेत्रावर खरीप पिकांची पेरणी झाली आहे

**..६/-**

**कोल्हापूर विभागात ९५ टक्के क्षेत्रावर पेरणी**

खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ९.८१ लाख हेक्टर असून ९.२९ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली आहे. सरासरी क्षेत्राशी तुलना करता ९५ टक्के क्षेत्रावर खरीप पिकांची पेरणी झाली आहे.

**औरंगाबाद विभागात १८.५३ लाख हेक्टरात पेरणी**

खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र १५.९३ लाख हेक्टर असून १८.५३ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली आहे. सरासरी क्षेत्राशी तुलना करता ११६ टक्के क्षेत्रावर खरीप पिकांची पेरणी झाली आहे

**लातूर विभागात खरीप पिकांची वाढ समाधानकारक**

खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २४.४९ लाख हेक्टर असुन २५.६४ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली आहे. सरासरी क्षेत्राशी तुलना करता १०५ टक्के क्षेत्रावर खरीप पिकांची पेरणी झाली आहे.

**अमरावती विभागात १०३ टक्के क्षेत्रावर खरीप पेरणी**

खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ३१.९२ लाख हेक्टर असुन ३२.८८ लाख हेक्टर क्षेत्रावर खरीप पिकाची पेरणी झाली आहे. सरासरी क्षेत्राशी तुलना करता १०३ टक्के क्षेत्रावर खरीप पिकांची पेरणी झालेली आहे.

**नागपूर विभागात १९.१७ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी**

खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र १७.६९ लाख हेक्टर असून १९.१७ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली आहे. सरासरी क्षेत्राशी तुलना करता १०८ टक्के क्षेत्रावर खरीप पिकाची पेरणी झाली आहे.

***जलाशय साठ्यात लक्षणीय वाढ***

राज्यामध्ये गेल्या वर्षी २०,२३६ द.ल.घ.मि. पाणीसाठा होता त्या तुलनेत यावर्षी ३०,११७ द.ल.घ.मि. पाणीसाठा झाला आहे. मागील वर्षीच्या ५५ टक्के पाणीसाठ्याच्या तुलनेत यंदा ८२ टक्के साठा आहे.

मागील वर्षी कोकणात ७७ टक्के जलाशय साठा होता. चालू वर्षी तो ८९ टक्के आहे. मराठवाड्यात १६ टक्के पाणीसाठा होता तो आता ७३ टक्के आहे. नागपूरात गतवर्षी ५७ टक्के पाणीसाठा होता तो यावर्षी ८० टक्के एवढा झाला आहे. अमरावती विभागात गतवर्षी ३४ टक्के पाणीसाठा होता त्यात यावर्षी लक्षणीय वाढ होऊन तो ८६ टक्के एवढा झाला आहे. नाशिक विभागात गतवर्षी ४९ टक्के पाणीसाठा होता तो यावर्षी ६४ टक्के झाला आहे. तर पुणे विभागात गतवर्षी ६६ टक्के पाणीसाठा होता तो यावर्षी ८७ टक्के एवढा झाला आहे.

---------

रजक/